दिनांक 07/07/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 16

विषय -1. नगपरिषद हद्दीतील प्रभाग क्रं.9 मधील सुर्यनगर सटवाई मंदिरासमोर सभागृह बांधणेबाबत उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग विटा यांचे दाखल पत्रावर निर्णय घेणे.

सुचना –

नगररचना विभागाकडील दिनांक 14/06/2022 रोजीच्या कार्यालयीन टिपनी नुसार नगपरिषद हद्दीतील प्रभाग क्रं.9 मधील सुर्यनगर सटवाई मंदिरासमोर सभागृह बांधणेबाबत उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग विटा यांचे पत्र पाहणेत आले. याकामी सादर करणेत आलेल्या नकाशानुसार प्रस्थावित सभागृह हे विटा शहर विकास योजना आरक्षण क्रं.133 बहुउद्देशिय हॉलसाठी आरक्षित असून विकास योजना पुस्तिकेनुसार सदर जागेचे क्षेत्रफळ 5 आर इतके आहे. सदरची जागा नगपरिषद मालकीची नाही. शासन निर्णय क्रमांक-नपावै-2021/प्र.क्र. 221 /नवि 16 दिनांक 03 नोव्हेंबर, 2021 मधील मुद्दा क्रं.2 नुसार सदर प्रकल्प खर्चाचा 90% हिस्सा राज्य शासनाचा व 10% हिस्सा नगपरिषद यांचा राहणार आहे. तसेच मुद्दा क्रं.9 नुसार सदर प्रकल्पा अंतर्गत कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत. तरी याकामी नगरपरिषद अटी व शर्तीस अधिन राहून मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

विषय -2. नगपरिषद हद्दीतील प्रभाग क्रं.9 मधील सुर्यनगर जोतिबा पावक्ता मंदिरासमोर सभागृह

बांधणेबाबत उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग विटा यांचे दाखल

पत्रावर निर्णय घेणे.

सुचना –

नगररचना विभागाकडील दिनांक 14/06/2022 रोजीच्या कार्यालयीन टिपनी नुसार नगपरिषद हद्दीतील प्रभाग क्रं. 9 मधील सुर्यनगर जोतिबा पावक्ता मंदिरासमोर सभागृह बांधणेबाबत उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग विटा यांचे पत्र पाहणेत आले. सदर प्रस्तावामधील 7/12 नुसार सदर कार्य हे गट क्र.103 या खाजगी जागेमध्ये प्रस्तावित आहेत. शासन निर्णय क्रमांक-नपावै-2021/प्र.क्र. 221 /नवि 16 दिनांक 03 नोव्हेंबर, 2021 मधील मुद्दा क्रं.2 नुसार सदर प्रकल्प खर्चाचा 90% हिस्सा राज्य शासनाचा व 10% हिस्सा नगपरिषद यांचा राहणार आहे. तसेच मुद्दा क्रं.9 नुसार सदर प्रकल्पा अंतर्गत कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत.तरी याकामी नगरपरिषद अटी व शर्तीस अधिन राहून मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

विषय -3. नगपरिषद हद्दीतील सुर्यनगर मारूती मंदिरासमोर सभागृह बांधणेबाबत उपविभागीय

अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग विटा यांचे दाखल पत्रावर निर्णय घेणे.

सुचना –

नगररचना विभागाकडील दिनांक 14/06/2022 रोजीच्या कार्यालयीन टिपनी नुसार नगपरिषद हद्दीतील सुर्यनगर मारूती मंदिरासमोर सभागृह बांधणेबाबत उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग विटा यांचे पत्र पाहणेत आले. सदर कार्य गट क्र.72/1/1 मध्ये प्रस्तावित असून सदर जागा ही खाजगी स्वरुपाची आहे. शासन निर्णय क्रमांक-नपावै-2021/प्र.क्र. 125(14) /नवि 16 दिनांक 18 ऑगस्ट, 2021 मधील मुद्दा क्रं.3 नुसार सदर प्रकल्प खर्चाचा 100% हिस्सा राज्य शासनाचा राहणार आहे. तसेच मुद्दा क्रं.8 नुसार सदर प्रकल्पा अंतर्गत कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत.तरी याकामी नगरपरिषद अटी व शर्तीस अधिन राहून मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक

विटा नगरपरिषद, विटा

सर्वसाधारण/प्रशासकीय सभा ठराव नं. 17 दिनांक 07/07/2022

विषय :- विटा शहर सुधारीत पाणी पुरवठा योजने कामी प्रकल्प अहवाल तयार करणे बाबत

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सांगली यांची तांत्रिक सेवा सल्लागार म्हणून नेमणूक करणे

बाबत.

संदर्भ :- नगरपरिषदेकडील इंजिनियर व मुख्याधिकारी यांनी दि.05/07/2022 चे मंजूर टिपणी

नुसार

विटा शहर सुधारीत पाणी पुरवठा योजनेबाबत दि.24/05/2022 रोजी मुंबई येथे मंत्री महोदय श्री.एकनाथजी शिंदे सो, नगरविकास मंत्री यांचे सोबत बैठक झालेली होती. विटा शहर पाणी पुरवठा योजना सक्षम होणेच्या दृष्टीने काही नवीन कामे प्रस्तावित करणे कामी प्रकल्प अहवाल तयार करणे बाबत म.जी.प्रा.या कार्यालयाकडे सुचना देणेत आलेल्या होत्या.

मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, सांगली यांचेकडील पत्र जा.क्र. /लेखा-2/करारनामा/1243/2022 दि.04/07/2022 ने सदर योजनेची तांत्रिक सेवा सल्लागार म्हणून काम करणार असलेबाबत नगरपरिषदेस कळविले आहे. तरी वरील

पत्राप्रमाणे विटा शहर सुधारीत पाणी पुरवठा योजनेचे प्रकल्प अहवाल अंदाजपत्रके, नकाशे तयार करणे कामी मा.कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग सांगली यांची तांत्रिक सेवा सल्लागार म्हणून नेमणूक करणेस

हि सभा मंजूरी देत आहे.

मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, सांगली यांचेकडील पत्र जा.क्र. /लेखा-2/करारनामा/1243/2022 दि.04/07/2022 यांचेकडील पत्राप्रमाणे करारनामा करून देणेत यावा व पुढील नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-

(श्री.संतोष भोर)

प्रशासक
विटा नगरपरिषद,विटा.

दिनांक 07/07/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 18

विषय:- नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक – नपावै-2022/प्र.क्रं.66अ(56-अ)/नवि.-16

मंत्रालय,मुंबई दिनांक 11/04/2022 प्रमाणे प्रस्तावित कामांसाठी प्रमाणपत्र देणेबाबत.

वरील विषयान्वये विटा नगरपरिषद हद्दीतील वैशिष्टयपुर्ण योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून 05 कामांसाठी 180.00 लक्ष अनुदान मंजूर करणेत आलेले आहे. संदर्भिय शासन निणर्यानुसार कार्यान्वयीन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग आहे. उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे व कार्यालयीन मंजूर टिपणी दि.07/07/2022 विचारात घेवून मी उपविभागीय अधिकारी तथा प्रशासक विटा नगरपरिषद, विटा म्हणून पुढील निर्णय पारीत करीत आहे.

वैशिष्टयपुर्ण योजने अतर्गत महाराष्ट्र शासनाकडून 05 कामांसाठी 180.00 लक्ष अनुदान मंजूर करणेत आलेले आहे.

1. प्रभाग क्र. 9 सुर्यनगर येथील पीर साहेब व वेताळबा हॉल बांधणे.
2. प्रभाग क्र. 9 सुर्यनगर येथे मारुती मंदिर समोर सभागृह बांधणे.
3. विटा येथील कराड रोड वरील मुस्लिम दफनभूमीस संरक्षक भिंत बांधणे.
4. विटा येथील सि.स.नं.2867 (गट नं. 503) मध्ये श्री. संत बसवेश्वर महाराज यांचे पुतळयासाठी चबुतरा व परिसर सुशोभित करणे.
5. विटा येथील नगरपरिषद हद्दीतील ढवळेश्वर तलाव परिसर सुशोभित करणे

वरील कामांची देखभाल व दुरुस्ती नगरपिरषद करणेस तयार आहे. तसेच शासन निर्णय क्रंमांक
– नपावै-2022/प्र.क्रं.66अ(56-अ)/नवि.-16 मंत्रालय,मुंबई दिनांक 11/04/2022 मधील मुद्दा क्रं.9 नुसार सदर प्रकल्पा अंतर्गत कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणी करावीत. तरी वरील कामांना उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून मागणी करण्यात आलेली प्रमाणपत्रे नगरपरिषद अटी व शर्तीस अधिन राहून देणेस मंजूरी देत आहे.

सही/-

( संतोष भोर)
प्रशासक

विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 07/07/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 19

**विषयः-** शासन निर्णय क्रंमांक - रस्ताअ-2022/प्र.क्रं.66ब(56-अ)/नवि.-16 मंत्रालय,मुंबई दिनांक 11/04/2022 प्रमाणे प्रस्तावित कामांसाठी प्रमाणपत्र देणेबाबत.

वरील विषयान्वये विटा नगरपरिषद हद्दीतील विशेष रस्ता अनुदान योजने अंतर्गत महाराष्ट्रण शासनाकडून 18 कामांसाठी 320.00 लक्ष अनुदान मंजूर करणेत आलेले आहे संदर्भिय शासन निणर्यानुसार कार्यान्वयीन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग आहे. उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे व कार्यालयीन मंजूर टिपणी दि.05/07/2022 विचारात घेवून मी उपविभागीय अधिकारी तथा प्रशासक विटा नगरपरिषद, विटा म्हणून पुढील निर्णय पारीत करीत आहे.

विटा नगरपरिषद हद्दीतील विशेष रस्ता अनुदान योजने अंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून 18 कामांसाठी 320.00 लक्ष अनुदान मंजूर करणेत आलेले आहे परंतु शासन निर्णयातील अ.क्र.10 चे काम पुर्ण झालेले आहे.

1. प्रभाग क्र.9 सुर्यनगर येथील दयाराम सुर्यवंशी घर ते मुळांखी ओढा मानाजी आबदर घरापर्यत जाणारा रस्ता डांबरीकरण करणे.
2. प्रभाग क्र.9 सुर्यनगर येथे श्रीकांत सुर्यवंशी घर ते तुकाराम सुर्यवंशी घर रस्ता डांबरीकरण करणे.
3. प्रभाग क्र.9 लक्ष्मीनगर ते शिदु जाधव घर रस्यावरील ओढ्यावर असणारा पुल बांधणे
4. प्रभाग क्र.9 भाळवणी रोड ते चंद्रहार पाटील तालीमकडे जाणारा रस्ता् करणे

5. प्रभाग क्र.10 मधील शेखर गायकवाड घर ते मारडकर घरापर्यत रस्ता व गटर करणे
6. प्रभाग क्र.10 मधील इंगळे घर ते पांढरी जाणारा रस्ता् गटर करणे
7. प्रभाग क्र.1 मधील दिलीप बागडे घर ते मारूती तारळेकर घरापर्यत रस्ता व गटर करणे
8. प्रभाग क्र.1 मधील जैन मंदिर ते कराड रोड रस्ता व गटर करणे
9. प्रभाग क्र.11 मधील म्हसवडसिध्द् मंदिर ते भैरवनाथ मंदिरापर्यत गटर करणे
10. प्रभाग क्र.11 मधील सचिन कुंभार घर ते सलीम शिकलगार घर रस्ता् व गटर करणे
11. प्रभाग क्र.11 मधील प्रकाश माने घर ते अशोक कोळी घरापर्यत रस्ता व गटर करणे
12. प्रभाग क्र.11 लंगडे घर ते तासगाव रोड पर्यत रस्ता व उभ्या पेठेतील मारूती मंदिरासमोर व बाजूला क्रॉक्रीटीकरण करणे
13. प्रभाग क्र.11 उमेश होनराव घर ते आबा कवडे घरापर्यत रस्ता व गटर व मुळे घर ते शितोळे गल्लीग डांबरीकरण रस्ता क्रॉक्रिट व गटर करणे
14. प्रभाग क्र.11 शितोळे गल्ली येथे लालासाहेब शिंदे घर ते समीर गायकवाड घरापर्यत रस्ता व गटर करणे
15. प्रभाग क्र.11 भवानीनगर येथील आडापासून पिराच्या मंदिराकडे जाणा-या रस्त्यावर गटर करणे
16. प्रभाग क्र.11 भवानीनगर येथील कळंबी रोड ते शिवाजी गडदरे यांच्या घरापर्यत रस्ता व सुबराव शिंदे दुकान ते चौकातील शिवाजी गडदरे घरापर्यत गटर करणे
17. विटा येथील शासकीय कार्यालये कोर्ट, प्रांत कार्यालय व तहसिल कार्यालय परिसरात कॉक्रिटीकरण करणे व परिसर सुशोभिकरण करणे व रस्ता करणे.

वरील कामांची देखभाल व दुरुस्ती नगरपिरषद करणेस तयार आहे. वरील कामांना उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून मागणी करण्यात आलेली प्रमाणपत्रे देणेस मंजूरी देत आहे.

सही/-

( संतोष भोर)
प्रशासक

विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 07/07/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 20

**विषय:-** शासननिर्णय क्र. रस्ताअ -2022/प्र.क्रं.66(ब-56)/नवि.-16 मंत्रालय,मुंबई दिनांक 30/03/2022 प्रमाणे प्रस्तावित कामांसाठी प्रमाणपत्र देणेबाबत.

वरील विषयान्वये विटा नगरपरिषद हद्दीतील विशेष रस्ता अनुदान योजने अंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून 28 कामांसाठी 500.00 लक्ष अनुदान मंजूर करणेत आलेले आहे संदर्भिय शासन निणर्यानुसार कार्यान्वयीन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग आहे. उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे व कार्यालयीन मंजूर टिपणी दि.05/07/2022 विचारात घेवून मी उपविभागीय अधिकारी तथा प्रशासक विटा नगरपरिषद, विटा म्हणून पुढील निर्णय पारीत करीत आहे.

विटा नगरपरिषद हद्दीतील विशेष रस्ता अनुदान योजने अंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून 28 कामांसाठी 500.00 लक्ष अनुदान मंजूर करणेत आलेले आहे परंतु शासन निर्णयातील अ.क्र.3, 15, 16, 17 व 20 ची कामे पुर्ण झालेली आहेत.

1. प्रभाग क्र.1 मधील सदाशिव मेटकरी घर ते तुकाराम मेटकरी घरापर्यंत रस्ता करणे
2. प्रभाग क्र.1 मधील किरण कुरकुटे घर ते शेंडे घरापर्यंत रस्ता व गटर करणे.
3. प्रभाग क्र.1 मधील साळशिंगे रोड ते मेटकरी घरापर्यंत रस्ता करणे.
4. प्रभाग क्र.2 मधील जगन्नाथ भोसले घर ते ओढ्यापर्यंत रस्ता करणे

5. प्रभाग क्र.2 मधील लक्ष्मी ट्रेडर्स ते राजेंद्र खटावकर घरापर्यत रस्ता करणे.
6. प्रभाग क्र.2 मधील कोळी सर घर ते भिंगारदेवे घरापर्यत रस्ता करणे.
7. प्रभाग क्र.3 मधील आयलेश शेठ घर ते सुशांत मेटकरी घरापर्यत रस्ता करणे
8. प्रभाग क्र.3 मधील शहाजी टेलर घर ते समिर मुल्ला घरापर्यत रस्ता करणे
9. प्रभाग क्र.3 मधील प्रितम सुतार घर ते नसिर जमादार घरापर्यत रस्ता व गटर करणे
10. प्रभाग क्र.3 मधील मंडले गुरूजी घर ते चव्हाण मॅडम घरापर्यत रस्ता करणे
11. प्रभाग क्र.4 मधील मार्केट यार्ड विटा येथे कॉक्रीटीकरण करणे
12. प्रभाग क्र.5 मधील सांगली रोड ते वलेकर हॉस्पिटल पर्यत जाणारा रस्ता व संतोष भिंगारदेवे घरापर्यत रस्ता करणे
13. प्रभाग क्र.5 मधील रमेश कदम घर ते विजय कदम घर रस्ता करणे
14. प्रभाग क्र.6 मधील अजम भई घर ते स्टॅडपर्यत रस्ता व गटर करणे
15. प्रभाग क्र.6 मधील असलम मुल्ला घर ते दयानंद बनसोडे घरापर्यत रस्ता व गटर करणे
16. प्रभाग क्र.7 मधील यशवंतनगर रस्ता 8 वसीम शिकलगार घर ते सुरेश शिंदे घर रस्ता करणे
17. प्रभाग क्र.8 मधील सुनिल माने घर ते नाईक घर रस्ता करणे
18. प्रभाग क्र.8 मधील सुरेंद्र शितोळे घर ते नेवरी रस्ता पर्यत रस्ता व गटर करणे
19. प्रभाग क्र.8 मधील सदामते घर ते महाडिक घर रस्ता करणे.
20. प्रभाग क्र.8 मधील जे.के.कांबळे घर ते रवि जोशी घर रस्ता व गटर करणे
21. प्रभाग क्र.8 मधील न.पा.शाळा नं.13 ते होनवार घर पर्यत रस्ता करणे.
22. प्रभाग क्र.8 मधील आर के पवार घर ते सुधाकर कवडे घर रस्ता व गटर करणे
23. प्रभाग क्र.8 शाहुनगर येथील नेवरी रोड ते कराड रोड कारपेट करणे

नगरपरिषद हद्दीतील वरील कामांची देखभाल व दुरुस्ती नगरपरिषद करणेस तयार आहे. वरील कामांना उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून मागणी करण्यात आलेली प्रमाणपत्रे देणेस मंजूरी देत आहे.

सही/-

( संतोष भोर)

प्रशासक

विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 07/07/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 21

विषय - नगपरिषद हद्दीमध्ये बेवारस प्रेते व लहान मुले दफनविधीसाठी जागा निश्चितीकरण करणेबाबत निर्णय घेणे.

आरोग्य विभागाकडील अहवालानुसार नगपरिषद हद्दीमध्ये बेवारस प्रेते व लहान मुले दफन करणेसाठी जागा उपलब्ध नसलेने बेवारस प्रेते व लहान मुले मृतदेह दफन करणे अडचणीचे होत आहे. सध्या नगपरिषद मालकीची कार्वे हद्दीमध्ये गट क्रं.702/2 ही जागा बेवारस प्रेतांचे दफन करणेसाठी सोईचे आहे. तरी सदर ठिकाणी 5 गुंठे जागा निश्चित करून सदर जागेला कंपाऊड करून फलक लावणेत यावा. सदरचे काम मंजूर कार्यालयीन टिपणी दिनांक 07/07/2022 नुसार करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवयश्क ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक

विटा नगरपरिषद, विटा